मा. न्यायालय प्रत.

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** नांदेड  **P.S.(ठाणे):** धर्माबाद

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0068  **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**06/04/2023 20:46

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार

**Time Period (कालावधी):** पहर 5

**Date From (दिनांक पासून):** 06/04/2023

**Date To ( दिनांक पर्यंत):** 06/04/2023

**Time From (वेळेपासून):** 12:10 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 14:15 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 06/04/2023  **Time (वेळ):** 20:34 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 022

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 06/04/2023 20:34 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 0.5 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** नगर पालीका धर्माबाद ,धर्माबाद

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** रमेश दमन्ना कनकापुरे
(b) **Father's Name (वडील चे नाव) :** दमन्ना
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1992
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रत्नाळी ता धर्माबाद,धर्माबाद,धर्माबाद,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रत्नाळी ता धर्माबाद,धर्माबाद,धर्माबाद,नांदेड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रतिक राजेंद्र माळवदे | | वडील का नाम : राजेंद्र | 1. कूडलवाडी ,कूडलवाडी , धर्माबाद,नांदेड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | गणेष गंगाधर दुदुलवाड | | वडील का नाम : गंगाधर | 1. पोचम्मा मंदीराजवळ रत्नाळी, धर्म्ाबाद ,धर्माबाद,नांदेड, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with CamScanner

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांकः-06/04/2023

मी रमेश दमन्ना कनकापुरे वय 31 वर्षे धंदा शिक्षण राहणार रत्नाळी ता. धर्माबाद जि. नांदेड मो.नं. 8623920707.

समक्ष पोलीस स्टेशन धर्माबाद येथे हजर येवुन फिर्याद देतो की, माझे नाव, वय, पत्ता वरील प्रमाणे असुन मी डाॅ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापिठ औरंगाबाद येथे षिक्षण घेत आहे.

दिनांक 07/02/2023 रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय नांदेड येथे तक्रार दिली की, माझी आई नामे मुत्यव्वा दमन्ना कनकापुरे हिचे नावे मौजे रत्नाळी येथे सव्र्हे नंबर 49/1 मध्ये प्लाॅट क्रमांक 10 (35×45) चैरस फूटाचा प्लाॅट आहे. सदरचा प्लाॅट माझ्या आईस विकणे आहे. त्या करीता त्या प्लाॅटची नगर पालीका धर्माबाद येथे गंुठेवारी करण्यासाठी दोन महिण्यापुर्वी अर्ज केला आहे. सदर गुंठेवारी करून देण्यासाठी मला नगर पालीका धर्माबाद येथील गंुठेवारी इंजिनिअर प्रतिक पुर्ण नाव माहीत नाही गणेश पुर्व नाव माहीत नाही यांचे मार्फतीने 8000/- रूपयाची लाचेची मागणी केली आहे. परंतु मला त्यांना लाच देण्याची इच्छा नाही. सदर कामासाठी अंदाजे 2000/-रूपये फिस लागत असल्याचे मला माहीत आहे. परंतु मला 8000/- रूपयाची लाच मागणी होत आहे.

तरी मला सदर कामासाठी लाच मागणारे नगर पालीका धर्माबाद येथील गुंठेवारी चे इंजिनिअर प्रतिक पुर्ण नाव माहित नाही यांच्यावर लाच मागीतल्याची कार्यवाही करावी. अशी तक्रार दिली आहे. त्यावरून लाप्रवि येथिल पो. उप-अधिक्षक श्री वांर्दे यांनी माझ्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 09/02/2023 रोजी कार्यवाही करणेसाठी धर्माबाद येथे नियोजित स्थळी येण्यास सांगितले होते. त्यावरून मी दिनांक 09/02/2023 रोजी मला फोनवरून सांगितल्या प्रमाणे कोंडलवाडी रोडवर धर्माबाद पासुन अंदाजे दोन किलोमिटर अंतरावर सुरक्षित ठिकाणी सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी 11.00 वा. पोहचलो. त्यावेळी सापळा पथकातील अधिकारी व अमलदार व पंचाचा पो. उप-अधिक्षक श्री.वांर्दे यांनी परीचय करून दिला.

त्यानंतर मी लाप्रवि नांदेड येथे दिलेल्या तक्रारी अर्जाबाबत थोडक्यात हकीकत सापळा पाथकातील अधिकारी व अमलदार व पंच यांना समक्ष तोंडी सांगितली. त्यानंतर मी लिहुन दिलेली तक्रार पंचाना वाचण्यास दिली. मी कथन केलेली हकीकत व लेखी तक्रार एकच असल्याची खात्री पटल्याने पंचानी त्यावर स्वाक्ष-या केल्या. त्यावरून पो.उप-अधिक्षक वांर्दे व पंचानी सदर तक्रारीचे अनुशंगाने लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय घेतला.

त्यानंतर पो.उप-अधिक्षक वांर्दे यांचे सुचनेवरून मला व पंच क्रं. 1) श्रीमती ममता गंगातीर याना सरकारी वाहनाने नगरपालीका धर्माबादच्या जवळ सोडताना सपोउपनि श्री शेटे यांनी व्हाईस रेकाॅर्डर चालु करून दोरीच्या सहयाने माझया गळयात शर्टच्या आतुन कोणास दिसनार नाही असे टाकुन दिला. त्यानुसार मी व पंच ममता गंगातीर असे आम्ही दोघे नगरपालीका धर्माबाद येथे गेलो, तेथे लोकसेवक प्रतीक इंजीनीअर हे त्याचे कार्यालयात दिसुन आले नाही. त्यावरून मी मध्यस्थी गणेश यांना फोन लावला असता ते म्हणाले थांबा मी पाच मिनिटात नगरपालीकेत आलो असे म्हणाले. मध्यस्थी गणेश हे नगरपालीकेत आल्यानंतर लोकसेवक प्रतिक नगरपालीका कार्यालयात आले नसल्याचे सांगितले व ते येणार नसल्याचे सांगितले. कामाचे संबंधाने मी विचारले असता गणेश म्हणाले की ते दोन फाईली काढायच्या आहेत त्या सोबत माझी पण फाईल घरी जावुन काढायला लावतो. एका फाईलला आठ हजार रूपये घेतो असे गणेष म्हणाला. सदर कामा साठी 10,000/- रूपये गणेषच्या फोन पेवर टाकण्यास गणेशने सांगितले. तेंव्हा मी त्यांना सांगितले एवढे पैसे नाहीत ते घराकडुन किंवा बाबाकडुन घेउन तुम्हाला देतो असे म्हणालो. मध्यस्थी गणेश म्हणाले की अजुन दोन फाईली आहेत त्या दोन फाईली मध्ये तुमची एक फाईल कमी पैशात काढतो. व त्याला म्हणतो की साहेब हया गरीबाला का परेशान करता म्हणुन अडजेस्ट करतो व कमीतकमी पैशात करतो पण तुम्ही दहा हजार रूपये काढुन ठेवा उरलेले पैसे परत देवुन टाकतो असे म्हणाला. आठ हजार रूपये तर लागतातच. आता माझ्याकडे दोन हजारच आहेत. असे म्हणालो असता गणेश म्हणाला जर त्यान कमी



Scanned with CamScanner

घेतल, एखादी सहा-सात हजार घेतल,ं हजार रूपये दारूच्या बाटलीला घेवुन टाकतो असे म्हणुन एकुण आठ हजाराची लाच मागणी लोकसेवक प्रतिक यांचे साठी आणि स्वतःसाठी मध्यस्त गणेश यांनी केली.
तुम्ही पैसे आनुन दया नाहीतर फोनपे वर टाका असे गणेष मला म्हणाला. व पैसे जमा करण्यास सांगितले व निघुन गेला. आम्ही परत सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी आलो गाडीत असतानं‍ा गणेष यांचा मला फाने आला आणि गणेश म्हणाला तुझे काम झाले नसेल तर पैसे परत देतो परंतु अकाउंटवर लवकर पैसे टाका. मी त्याना म्हणालो प्रतिक सर यांच्या अकांउटवर टाकु का? तेव्हा तो म्हणाला तसे जमत नाही.एकतर माझे अकांउटवर टाका किंवा नगदी आणुन दया. असे म्हणुन फोन कट केला.
लोकसेवक प्रतिक सर यांची लाचमागणी पडताळणी अवष्यक असल्याने पोउप अधीक्षक श्री.वांर्दे साहेब यांनी पचासमक्ष , व्हाईसरेका‍ॅर्डर चालु करून गणेश यास फोन लावुन बोललो असता गणेष म्हणाला मी निझामबाद येथे जाणार आहे तु पैसे माझे घरी जाउन दे. मी त्यांना म्हणाला माझे कडे आता पैसे नसल्यामुळे मी बहिणेकडे जावुन पैसे घेवुन आणुन देतो.
मी माहिती काढली असता प्रतिक सर हे नगरपालीका धर्माबाद येथे फक्त बुधवार व गुरूवारी कार्यालयात असतात ईतर दिवषी ते नगरपालीका कुंडलवाडी येथे असतात त्यांच्याकडे धर्माबादचा अतिरिक्त कार्यभार आहे हि माहिती मला मिळाली.
दिनांक 22/02/2023 रोजी पंचासह त्यांना भेटण्यासाठी मी गेलो असता ते कार्यालयात आले नव्हते. दिनांक 23/02/2023 रोजीपण मी पंचासह त्यांना भेटण्यासाठी नगरपालीका कार्यालय धर्माबाद येथे गेलो पण ते कार्यालयात आले नव्हते. त्यांना त्यांचे मोबाईल क्रंमाक 8805108623 वर पंचासमक्ष आणि व्हाईस रेका‍ॅर्डर समक्ष फोन लावुन विचारले असता ते मला म्हणाले येत्या बुधवारी सदर कामाचे फा‍ॅलोअप गणेश मेसवाला यांच्या मार्फतीने घ्यावे मी त्यांना म्हणालो सदर कामासाठी गणेश मला दहाहजार रूपये सांगत आहे ते जास्त होतात तेव्हा प्रतिक सर म्हणाले सहा-सात मध्ये होवुन जाईल त्यांनतर व्हाईस रेका‍ॅर्डर बंद करण्यात आला.
बुधवारी माझे सांगणेवरून दिनांक 01/03/2023 रोजी सापळा पथक धर्माबाद येथे अतकुर षिवारात येवुन थांबले तेव्हा पो.उप.अधीक्षक श्रीं वांदे‍्र सर यांनी लोकसेवक प्रतिक ईंजिनीयर बाबत विचारणा केली तेव्हा मी लोकसेवक कार्यालयात आले नाही असे सांगितले. तेव्हा त्यांनी मला लोकसेवक यांना फोन लावुन कामा संबधाने विचारपुस करण्यात यांवी असे कळविले. त्यावरून सपोउपनि/षेटे यांनी व्हाईस रेका‍ॅर्डर चालु करून पो. उप-अधिक्षक वांद्रे यांनी मला लो‍ेकसेवक प्रतिक यांना स्पिकर आ‍ॅन करून फोन लावण्यास सांगितले. त्यावरून मी माझे मोबाईल क्र.8623920707 वरून लोकसेवक प्रतिकसर याना त्यांचे मोबाईल क्र.8805108623 यावर का‍ॅल केला असता गुंठेवारी इंजिनीयर प्रतिक यांनी सांगितले तुझा आईच्या नावामध्ये त्रुर्टी आहे. व त्यांची पुर्तता करून घ्या असे म्हणाले त्यामुळे सदर त्रुर्टी पुर्तता करून घेवून लोकसेवक प्रतिक हे काय सागतात त्याबाबत पो.उप-अधिक्षक वांदे‍्रसर यांना कळवितो असे सांगितले.
दिनांक 08/03/2023 रोजी मी गुठेवारी ईजिनियर प्रतिक सर यांना माझ्या कामाचे संबंधाने विचारपुस करण्यासाठी जाणार आह.े लोकसेवक प्रतिक यांनी त्रुर्टी पुर्तता करण्यासाठी सागितली होती ती पुर्ण केली आहे असे पो. उप-अधिक्षक श्री वांद्रेसर याना सांगिलले त्यावरून सापळा पथक धर्माबाद षिवारात आले. लोकसेवक प्रतिक यांनी दिनांक 23/02/2023 रोजी फोनवर केलेल्या लाचमागणी प्रमाणे आज मी लोकसेवक प्रतिकसर यांना कामा संबंधाने विचारपुस करण्यासाठी गेलो असता ते लाचेची मागणी करून स्विकारण्याची शक्यता आहे असे सांगितले. त्यावरून पो.उप-अधिक्षक श्री वांदे‍्र सर यांनी सापळा कार्यवाही करण्याचा निर्णय घेतला. त्यावरून पो.उप-अधिक्षक श्री वांर्दे सर यांनी मला माझे कडील सर्व चिजवस्तु बाहेर काढुन ठेवण्यास सांगितले. त्यावरून मी लाच म्हणुन देण्याकरीता आणलेली लाचेची रक्कम 7000/- रूपये काढुन दिली. त्यानंतर मला व पंचांना नियोजित सापळा कार्यवाही मध्ये अ‍ॅन्थ्रा‍ॅसीन पावडरचा उपयोग करणार असल्याचे सांगुन अ‍ॅन्थ्रा‍ॅसीन पावडरचे व अल्ट्राव्हायलेट लॅम्पचे गुणधर्म समाजावुन सांगितले. त्यानंतर पंच श्रीमती ममता आनंदराव गंगातीर यांना मी दिलेल्या भारतीय चलनातील 500 रूपये दराच्या चौदा नोटांचे नंबर एका कागदावर नोंदवुन घेण्यास सांगितले.
सदर चलनी नोटाना पोका‍ॅ/कुलथे यांनी कागदावर ठेवुन नोटांचे दोन्ही बाजुस उजव्या हाताचे बोटाने अ‍ॅन्थ्रा‍ॅसिन पावडर लावली. सदर नोटा त्यांनी माझे पं‍ॅटचे उजव्या बाजुचे खिशात काही एक चिज वस्तु नसल्याची खात्री करून अलगद ठेवण्यात आल्या. त्यानंतर पो.उप-अधिक्षक श्री वांद्रेसर यानी मला सुचना दिल्या की, मी पंच श्री. नरेंद्र पांडुरंग मस्के यांचे सोबत जावुन लोकसेवक गं‍ुठेवारी इंजिनिअर प्रतिक सर यांची भेट घ्यावी व त्यं‍ाना तुमच्या कामाचे संबंधाने बोलावे आपले सांगणे प्रमाणे आपणास कामाची आठवण करून देण्यास आलो असे सांगावे व लाचेची मागणी केल्यास त्याना तुमचे खिषातील लाचेची रक्कम काढुन लोकसेवक यांचे समोर धरावी. त्यांनी लाचेची रक्कम स्विकारल्या नंतर मोजुन घ्या म्हणावे लोकसेवक नोटा मोजत असताना आपण सापळा



Scanned with CamScanner

पथकास दिसेल अशा रितीने गळयातील उपरणे काढुन हातात धरून लाच स्विकारल्याचा ईषारा करावा. सुचने प्रमाणे सपोउपनि/श्री षेटे यांनी डिजिटल व्हाईस रेकाॅर्डर गळयात लटकावुन दिले. त्यानंतर मला व पंच श्री. नरेंद्र पांडुरंग मस्के यांना गुंठेवारी इंजिनीयर श्री. प्रतिक यांना भेटण्यासाठी पायी-पायी रवाना करण्यात आले. त्यापाठोपाठ सपोउपनि/षेटे, स्वतः पो.उप-अधिक्षक श्री वांद्रेसर, पोलीस निरीक्षक श्री.नाईक, सपोउपनि श्री मांजरमकर, पंच क्रं. 2 श्रीमती ममता गंगातीर व पोकाॅ/कुलथे असे कोणास संशय येणार नाही असे एका पाठोपाठ काही अंतराने रवाना झाले. मी व पंच नरेंद्र मस्के हे धर्माबाद येथील नगरपालीकेतील गुंठेवारी इंजिनीयर प्रतिकसर बसत असलेल्या कक्षात गेलो. मी गंुठेवारी इंजिनियर प्रतिक सर यांना म्हणालो की, आपण सांगितल्या प्रमाणे मी आलो आहे. व कामाचे संबंधाने विचारले असता लोकसेवक म्हणाले की "मी काम झाल्यावर पैसे घेतो. काम होउ दे सगळ नंतर बघु. आपण चकरा मारू नका, काम झाल्यावर मी तुम्हाला फोन लावतो असे कळविले." त्यावरून आम्ही परत आलो. मी व पंच हे नगरपालीका कार्यालयातुन रेल्वेस्टेषन परीसरात सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी आलेनंतर सपोउपनि/श्री शेटे यांनी माझे कडील व्हाईसरेकाॅर्डर ताब्यात घेवुन बंद केले. त्यानंतर प्रतिक ईजिनीयर यांनी काम झाल्यानंतर ते पैसे घेणार असल्याने पो.उप-अधिक्षक श्री वांद्रेसर यांनी पंचाचे सहमतीने लोकसेवक यांचा मला काम झाल्या बाबतचा संदेष मिळेपर्यंत सापळा कार्यवाही स्थगीत करण्याचे ठरविले.

सुमारे पंधरा दिवसा नंतर मी पो.उप-अधिक्षक श्री वांद्रेसर यांना फोनवर कळविले की दिनांक 23/03/2023 रोजी मी गुठेवारी ईजिनिअर श्री. प्रतिक सर यानां माझे काम झाले का याबाबत विचारण्यासाठी जाणार आहे. माझे काम झाले असल्यास ते मला पैषाची मागणी करून स्विकारण्याची शक्यता आहे. त्यामुळे आपण सापळा कार्यवाही करण्यासाठी यावे असे कळविले. त्यावरून सापळा पथक महाराश्ट्र तेलंगाना सिमारेशे जवळ बासर रोड येथे धर्माबाद षिवारात सुरक्षित ठिकाणी आले. त्यानंतर श्री वांद्रेसर यांनी या अगोदर मी सापळा कार्यवाही साठी दिलेल्या 500 रूपये दराच्या 14 नोटा ज्या मागिल कार्यवाही नंतर त्याचे कडेच होत्या त्या एकाबंद पाकीटतुन काढुन पोकाॅ/दाबनवाड यांनी त्यावर अॅन्थ्रासिन पावडर असल्याची अल्ट्राव्हायलेट प्रकषात खात्री केली. व सदर नोटा माझे पंॅटचे उजव्या बाजुचे खिशाल काही एक चिज वस्तु नसल्याची खात्री करून अलगद ठेवण्यात आल्या. सुचने प्रमाणे पोका/जाधव यांनी डिजिटल व्हाईस रेकाॅर्डर चालु करून माझे गळयात कोणास दिसनार नाही अषा रितीने शर्टच्या खाली दोरीच्या सहयाने गळयात लटकावुन दिले. त्यानंतर मला व पंच श्री. नरेंद्र पांडुरंग मस्के यांना गुंठेवारी इंजिनीयर श्री. प्रतिक यांना भेटण्यासाठी रवाना करण्यात आले. त्यापाठोपाठ पोकाॅ/जाधव, स्वतः पो.उप-अधिक्षक श्री वांद्रेसर, सपोउपनि श्री मांजरमकर, पंच क्रं. 2 श्रीमती ममता गंगातीर व पोकाॅ/दाबनवाड असे कोणास संशय येणार नाही असे एका पाठोपाठ काही अंतराने रवाना झाले., मी व पंच नरेंद्र मस्के हे धर्माबाद येथील नगरपालीकेतील गुंठेवारी इंजिनीअर प्रतिकसर बसत असलेल्या कक्षात गेलो. मी गंुठेवारी इंजिनिअर प्रतिक सर यांना म्हणालो की, सर माझे काम झाले काय त्यावर गुंठेवारी प्रतिक इंजिनीअर म्हणाले की मॅडमची सही झाली नाही. काम झाल्यावर मी तुम्हाला फोन लावतो असे कळविले. त्यावरून मी व पंच हे नगरपालीका कार्यालयातुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी आलेनंतर पोकाॅ/जाधव यांनी माझे कडील व्हाईसरेकाॅर्डर ताब्यात घेवुन बंद केले. त्यानंतर प्रतिक इंजिनीअर यांनी मॅडमची सही झाली नाही. काम झाल्यावर मी तुम्हाला फोन लावतो असे कळविले असल्याने पो.उप-अधिक्षक श्री. वांद्रेसर यांनी पंचाचे सहमतीने लोकसेवक यांचा मला काम झाल्या बाबतचा संदेष मिळेपर्यंत सापळा कार्यवाही स्थगीत केल्याचे ठरविले.

दिनांक 29/03/2023 रोजी गुंठेवारी इंजिनीयर प्रतिकसर हे बुधवारी नगर पालीका कार्यालयात येणार असल्याने मी त्यांना कामा संबंधाने भेटण्यासाठी जाणार असल्याचे वांद्रेसर याना कळविल्याने सापळा पथक हे धर्माबाद येथे आले. आम्ही दिवसभर प्रतिक सर यांची वाट पाहिली परंतु त्यांचा फोन आला नाही म्हणुन आम्ही परत निघुन गेलो.

आज दिनांक 06/04/2023 रोजी मी सांगीतल्या प्रमाणे लाप्रवि नांदेड येथील सापळा पथक उमरी रोडवर येवुन थांबले मला सापळा कार्यवाही बाबत परत एकदा सर्व सुचना दिल्या. डिजिटल व्हाईस रेकाॅर्डर चालु करून माझे गळयात अडकाविले. लाचेची रक्कम बंद पाकीटातुन काढुन अॅन्थ्रासिन पावडर असल्याची खात्री करून माझे पॅन्टच्या उजव्या खिषात ठेवण्यात आली. लाच स्विकारल्यास डोक्यावरील रूमाल काढुन खिशात ठेवण्यास सांगीतले. मी पंचासह माझे मोटार सायकलने नगरपालीका कार्यालय धर्माबाद येथे पोहचलो माझे मागे कांही अंतरावर संपुर्ण सापळा पथक होते. मी कार्यालयात जावुन बराच वेळ थांबलो प्रतिक सर यांना बोलण्याचा प्रयत्न केला असता, त्यंानी मला थांब म्हणुन सांगीतले नंतर ते तीन चार वेळेस सीओ मॅडमच्या कॅबीन मध्ये जावुन आले. प्रतिक सर यांना माझा संशय आल्याने त्यांनी त्यांचे सोबतचे मान्यताप्राप्त खाजगी इंजीनिअर श्री.गोविंद श्रीनिवास झंवर यांना माझी फाईल देवुन पावती फाडण्यासाठी पाठविले. त्यांनी मला हाताने स्पर्श करून ईशारा केला आणि खाली बोलावुन नेले. ते मला प्रतिक सरांसाठी लाच मागतील असे वाटल्यावरून मी लागलीच सापळापथकातील



Scanned with CamScanner

पोउपअध्ािक्षक श्री.इप्पर सर यांना फोन करून घटना सांगीतली असता त्यांनी जे लाचमागतील त्यानांच लाच देण्यासाठी सांगीतले. आणि लाच देताना गुंठेवारीच्या कामाविशयी बोलण्याचे सांगीतले.

मी गोविंद श्रीनिवास झंवर यांच्या सोबत वसुली लिपीक राजेश लक्ष्मणराव खटके यांच्याकडे गेलो त्यांनी मला गुंठेवारीची पावती फाडण्यासाठी 2892/- रूपयाची मागणी केली. मी लाचेच्या रक्कमेतील पाचशे रूपये दराच्या सहा नोटा त्यांना देवुन टाकल्या त्यांनी मला उर्वरित रक्कम परत दिली. आणि सोबत रक्कमेची पावती पण दिली उर्वरित लाच संषय आल्यामुळे न मागीतल्याने ठरल्या प्रमाणे मी माझे खांदयावरील रूमाल माझे खिषामध्ये ठेवला माझा ईशारा पहाताच सापळ्यामधील सर्व लोक आले त्यांनी प्रतिक यांना ताब्यात घेतले. त्यांना त्यांचे संपुर्ण नांव गांव व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नांव प्रतिक राजेंद्र माळवदे व 29 वर्श पद नगर रचना सहायक अभियंता, नगर पालीका कुंडलवाडी अतिरिक्त कार्यभार धर्माबाद असे सांगीतले त्यानंतर लाच मागण्यासाठी प्रोत्साहन देणारा खाजगी ईसम नामे गणेष गंगाधर दुदुुलवाड वय 42 वर्श व्यवसाय मेस चालक रा. रत्नाळी यास पोकाॅ/कुलथे पोना/मेकाले चालक/मामुलवाड यांना सांगुन ताब्यात घेण्यात आले. सापळ्या नंतरची कार्यवाही लोकसेवक यांच्या कक्षामध्येच करण्यात आली.

तरी माझी आई नामे मुत्यव्वा दमन्ना कनकापुरे यांचे नांवावर असलेला प्लाॅटची गुंठेवारी करण्यासाठी यातील लोकसेवक 1) प्रतिक राजेंद्र माळवदे व 29 वर्श पद नगर रचना सहायक अभियंता, नगर पालीका कुंडलवाडी अतिरिक्त कार्यभार धर्माबाद यांनी खाजगी ईसम नामे 2) गणेष गंगाधर दुदुलवाड वय 42 वर्श व्यवसाय मेस चालक रा. रत्नाळी यांचे मार्फत 10,000/-रूपयाची मागणी केली आणि तडजोडी अंती 7000/-रूपये स्विकारण्याचे मान्यकेले. सापळा कार्यवाही दरम्यान संशय आल्यामुळे प्रत्यक्षात रक्कम स्विकारली नाही. खाजगी ईसमाने लाच मागणी करण्यासाठी प्रोत्साहन दिले. एकंदरीत शासकिय कामासाठी लाचेची मागणी केल्यामुळे लोकसेवक आणि त्यांच्या सोबत असना-या खाजगी ईसमावर योग्यती कायदेषिर कार्यवाही करण्यात यावी.

ही फिर्याद दिली

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SANJAY Bhimashankar HIBARE(I (Inspector)) / POBN64446

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with CamScanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** SANJAY Bhimashank

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):** POBN64446

पोलीस स्टेशन धर्माबाद
जि. नांदेड

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस स्टेशन धर्माबाद



Scanned with CamScanner